निर्बंधांमुळे लोकांची फार कोंडी होणार नाही -वडेट्टीवार

वार्ताहर/नागपूर

राज्य सरकारने करोनाचा नवा विषाणू ओमायक्रॉनच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर निर्बंध जाहीर केले. यावर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी ठाकरे सरकारने आम्हाला विश्वासात न घेता निर्णय घेतल्याचा आरोप केला. यावर राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली. केंद्र सरकार नियम बनवताना किंवा निर्बंध लावताना कुठे राज्य सरकारला विश्वासात घेत आहे, असा सवाल वडेट्टीवार यांनी केला.

केंद्र सरकारने कोणत्याच राज्य सरकारला विश्वासात घेऊन नियमावली लागू केलेली नाही, असेही त्यांनी नमूद केले. विजय वडेट्टीवार म्हणाले, आरोग्याशी संबंधित राज्याच्या हिताचा विषय असेल तर राज्य सरकार परिस्थिती पाहून नियम बदलत असते. उद्या करोना स्थिती कमी झाली तर नियम बदलावे लागतील. चंद्रकांत पाटील महाराष्ट्राबाबत असे बोलतात, पण बाकीच्या राज्यांमध्ये नियम लावताना त्यांनी किती विरोधी पक्षांना सोबत घेतले आहे. इतर राज्यात अस काही झालेय का? सरकार म्हणून जबाबदारी असते. ती जबाबदारी पार पाडावी लागते. चंद्रकांत पाटलांना प्रत्येक ठिकाणी विश्वास हवा असेल तर त्यांनी मोदींनाही विरोधी पक्षाला विश्वासात घ्यायला सांगावे, असे म्हणत वडेट्टीवार यांनी भाजपाला टोला लगावला.

विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले, सध्या तरी राज्यात ओमायक्रॉन बाधित रूग्णसंख्या अजूनही मर्यादित आहे. त्याची तीव्रता काय, किती रूग्णांना ऑक्सिजन लागेल हे येणाऱ्या काळात कळेल. ज्यांनी करोना लसीचे दोन डोस घेतले आहेत. त्यांना फार त्रास होत नाहीये. मात्र, लस न घेणाऱ्यांना ऑक्सिजनची गरज लागत आहे, असे काही ठिकाणी दिसते. त्यामुळे आम्ही लसीकरणावर देखील भर देत आहोत.

सध्या करोना रूग्णांची संख्या रोज दुप्पट होत आहे. आत्ता ५ राज्यांच्या निवडणुका घोषित झाल्यात. त्यात निवडणूक आयोगाने कुठेही सभांना परवानगी दिलेली नाही. त्यामुळे सार्वजनिक सभांशिवाय होणारी ही कदाचित पहिली निवडणूक असावी. केंद्र, निवडणूक आयोग किंवा राज्य सरकार जे निर्णय घेत आहे ते लोकांच्या हितासाठी घेत आहे. या निर्बंधांमुळे लोकांची फार कोंडी होणार नाही, असेही वडेट्टीवार यांनी नमूद केले.

राज्य निवडणूक आयोग कुणाचे ऐकते हे स्पष्ट -पटोले

वार्ताहर/नागपूर

राज्य निवडणूक आयोग कुणाचे ऐकते, कुणाच्या इशाऱ्यावर चालते, हे स्पष्ट झाल्याने महापालिका निवडणुका पुढे ढकलल्या जाव्यात, ही मागणी करण्यात अर्थ नाही, अशी नाराजी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केली.

नागपूरला आले असता पत्रकारांशी बोलताना नाना पटोले म्हणाले, राज्यातील नगरपंचायत आणि भंडारा-गोंदिया जिल्हा परिषद निवडणुका होत आहेत. ओबीसी आरक्षण व करोना स्थिती लक्षात घेऊन या निवडणुका घेऊ नये, असा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. निवडणूक आयोगाकडे हा निर्णय पाठवल्यानंतरही निवडणुका जाहीर केल्या. यावरून त्यांचे काम कुणाच्या इशाऱ्यावरून चालते हे स्पष्ट होते.

विधानसभा निवडणूक होणाऱ्या सर्व राज्यांत काँग्रेस तयार आहे. शेतकरी, गरीब, छोट्या व्यापाऱ्यांच्या प्रश्नांपासून जनतेला विचलित करण्याचे काम भाजपकडून सुरू आहे. सत्तेच्या बाहेर असले की 'देश को बचाना है' आणि सत्तेत असले की स्वत:ला वाचवणे, अशी त्यांची घोषणा असते. त्यांची ही भूमिका जनतेने ओळखली आहे. त्यामुळे अनेक राज्यांत काँग्रेसची सत्ता येईल, असा दावाही पटोले यांनी केला.

राज्यातील मंत्र्यांविरोधात आमदारांमध्ये नाराजी असल्याचा नाना पटोले यांनी इन्कार केला. आमदार, कार्यकर्त्यांनी पक्षश्रेष्ठींना भेटणे चुकीचे नाही, मंत्र्यांबाबत नाराजी असल्याची काही कल्पना नाही व तशी तक्रारही आलेली नाही. राज्यात पक्षाचे सर्व नेते एकजुटीने काम करत असल्याने आमच्याकडून जनतेच्या फार अपेक्षा आहे, असा दावाही त्यांनी केला.

कास पठाराचा देखावा २६ जानेवारीच्या संचलनात

रामभाऊ जगताप/कराड

येत्या २६ जानेवारी रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनामध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथात साताऱ्यातील जगप्रसिद्ध कास पठारावरील फुले व प्राण्यांच्या विविध प्रजातींचा समावेश करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांपूर्वीच कास पठाराचा जागतिक वारसास्थळात समावेश करण्यात आल्यामुळे सातारा जिल्हावासियांसाठी ही बाब अभिमानास्पद असल्याचे मानले जाते.

प्रजासत्ताकदिनी नवी दिल्ली येथील परेडमध्ये प्रत्येक राज्याच्या चित्ररथाचा समावेश असतो. या चित्ररथांमधून प्रत्येक राज्य आपली संस्कृती दाखवण्याचा प्रयत्न करत असतात. यावर्षी २६ जानेवारी रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या परेडमध्ये राज्याची समृद्ध जैवविविधता दाखवण्याच्या उद्देशाने चित्ररथ तयार करण्यात आला आहे. या चित्ररथावरील मुख्य देखाव्यामध्ये सातारा येथील कास पठाराचे दृश्य पाहायला मिळणार आहे. कास पठाराला फुलांची पंढरी म्हणूनही

ओळखले जाते. फुलांच्या ८५० पेक्षा जास्त प्रजाती या पठारावर आढळून येतात. यामध्ये ऑर्किड, झुडूप आणि मांसाहारी वनस्पतींचा समावेश आहे. विशेषतः या पठारावर वनौषधी वनस्पती फार मोठ्या प्रमाणावर असल्याचा निष्कर्ष अभ्यासकांनी काढला आहे.

दरम्यान, या चित्ररथावर कास पठाराप्रमाणेच माळढोक पक्षी, ग्रेट इंडियन बस्टर्ड आणि खेकड्याच्या नवीन शोधलेल्या प्रजातींचा देखावाही असणार आहे. याशिवाय वाघ, फ्लेमिंगो, मासे, गिधाड आणि घुबडांचेही देखावे असणार आहे. तसेच शेकरू हा राज्य प्राणी तर हरियाल कबुतर हा राज्य पक्षी असणार आहे. ब्लू मॉर्मन हे राज्य फुलपाखरू असलेले महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. राज्याच्या चित्ररथात फुलपाखराचे आठ फुट उंच आणि सहा फुट रुंद मॉडेल असेल.

जाहीर सूचना

ICICI Bank
ICICI Bank Limited

नोंदणीकृत कार्यालय : लॅन्डमार्क, रेस कोर्स सर्कल, वडोदरा ३९० ००७.
निगम कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई ४०० ०५१.

सोने लिलाव नि निमंत्रण सूचना

आयसीआयसीआय बँक लिमिटेड (आयसीआयसीआय बँक) यांच्याकडून खालील नमूद कर्जदारांनी सोन्याच्या दागिन्यांवर प्राप्त करण्यात आलेल्या सुविधांसंबंधी (''सुविधा'') त्यांच्या थकीत रकमेचा भरणा करण्यास सूचना निर्गमित करण्यात आली होती. सुविधे अंतर्गत कर्जदार त्यांच्या थकीत रकमेचा भरणा करण्यास कसूरवार ठरल्याने आम्ही, **जाने २०, २०२२** रोजी ताबेगहाण असलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करण्यास भाग आहोत. आयसीआयसीआय बँकेस खालील कोणतेही खाते पूर्वसूचना न देता काढून टाकण्याचे प्राधिकार आहेत. पुढे आयसीआयसीआय बँक कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय लिलावाची तारीख बदलण्याचे हक्क राखून ठेवत आहेत. **लिलाव https://jewel-auction.procuretiger.com** द्वारे **दु. १२.३० ते दु. ३.३०** यावेळेत घेण्यात येईल. अटी आणि शर्तीच्या अधिक तपशिलाकरीता कृपया दिलेल्या वेबसाईटवर लॉगइन करा. ग्राहकाचे निधन झाल्यास लिलावासंबंधी सर्व अटी त्यांचे कायदेशीर वारस यांस लागू होतील.

कर्ज खाते क्र.	ग्राहकाचे नाव
शाखाचे नाव: अचलपूर	
०८६८०५००१६४५	अमोल अरुणराव कवळकर
०८६८०५००३१५०	रोहन रवींद्र यादव
शाखाचे नाव: अकोला	
०५२००५००३९७६	प्रवीण गोपीकिसन गांधी
शाखाचे नाव: अकोट	
१८६३०५००१७६७	तन्वीर पटेल जमीर पटेल
१८६३०५०००२९०९	मोहन श्रीकृष्ण धर्मे
शाखाचे नाव: अंबड	
२००८०५००७५५६	रमेश भानुदास डांगे
शाखाचे नाव: अंबेजोगाई	
२१९२०५००४२९५	अशोक पंडितराव यादव
२१९२०५००४६९८	हरिश्चंद्र श्रीरंग तौर
२१९२०५००४८९७	ज्योती शिवप्रकाश हिरमठ
२१९२०५००६१२९	संतोष सुधाकर मोरे
२१९२०५००६३२९	किशोर बाळासाहेब देशमुख
२१९२०५००६६४७	सुषमा लक्ष्मणराव गायकवाड
२१९२०५००६६५७	रुषिकेश राजेंद्र साबणे
शाखाचे नाव: अमरावती-जयस्तंभ स्क्वेअर	
६९६९०५६०१९०९	राबिया बी नजीर खान
शाखाचे नाव: अमरावती	
०४२८०५००४२२२	सफियाबानो खान
०४२८०५००७७०५	इसाक शेख
शाखाचे नाव: अमरावती - व्हीएमव्ही कॉलेज रोड	
३४५३०५००१६४०	अमीन खान जाहिर खान खान
३४५३०५००१८२०	भूषण नारायण बैराम
शाखाचे नाव: आर्वी	
४०५१०५०००४२८	शोएब अर्शद शेख
४०५१०५०००६८८	शोएब अर्शद शेख
शाखाचे नाव: औरंगाबाद - हुडको	
३५०४०५०००५४८	श्रीमंत कल्याण कोरडे
३५०४०५०००९२४	राहुल प्रभाकर चटलावार
शाखाचे नाव: औरंगाबाद-टिळकनगर	
१४५५०५००२६५४	मत्युरी मुरलीधर पालकर
शाखाचे नाव: औसा	
२०२५०५००९२३३	गौरीशंकर बाबुअप्पा भागुडे
२०२५०५००९२२७	अनिल व्यंकट कावळे
२०२५०५००९२४८	शेखजुनेद अहमद वजीरसाब
२०२५०५००९६३६	अजित जगदीश तडाव
शाखाचे नाव: बल्लारपूर	
१८६४०५००१७३८	सुनंदा नंदकिशोर मोरे
१८६४०५००१७२७	सुमित किशोर रैच
शाखाचे नाव: भद्रावती	
४३१६०५००१११९	पिंकू वसंता कोहळे
शाखाचे नाव: भालेगाव	
२९२२०५०००२०६	सुरेश गुलाबराव जावरे
शाखाचे नाव: भूम	
३७६२०५००२१९९	संतोष दत्तात्रय नलवडे
शाखाचे नाव: बिडकीन	
३०६३०५०००७८२	महेंद्रसिंग सुकत सहानी
शाखाचे नाव: चंद्रपूर	
०८७००५००११५१	विपुल रत्नाकर डोहे
शाखाचे नाव: धुळे	
६४६३०५००३८११	विनोद प्रकाश पाटील
६४६३०५००३९१०	सुनील किसन गायकवाड
शाखाचे नाव: धुळे-देवपूर	
१८६५०५०००२१५६	सुरेश शांताराम बागुल
शाखाचे नाव: डोळंबा	
४१९६०५०००१३६	गुलाबराव गोवर्धन पवार

कर्ज खाते क्र.	ग्राहकाचे नाव
शाखाचे नाव: दोंडाईचा	
२१४८०५००४२८३	कांतीलाल अडागळे
२१४८०५००७०२०	प्रकाश जगतसिंग गिरासे
२१४८०५००७६०३	मनोहर जोहरलाल गिरासे
२१४८०५००६०७०	मंगलबाई बिलास पाटील
२१४८०५००८०४०	राजेंद्र गाबा पाटील
२१४८०५००८७३१	सावन हिम्मत गुमाने
२१४८०५००८७६४	चुडामण यशवंत पाटील
२१४८०५००९९९४	प्रकाश आनंदसिंग भिल
२१४८०५००९२३१	धनराज हिलाल महाजन
२१४८०५०१७७५३	कृष्णा गजमल इंदवे
शाखाचे नाव: गंगाखेड	
३८३६०५००९२१३	अतुल भागवत बिडवई
शाखाचे नाव: गंगापूर	
३७६५०५००२९९५	संग्रामसिंग बाबुसिंग राजपूत
शाखाचे नाव: गोंदिया	
१०७२०५०००९१०	प्रेम महादेव खिरेकर
१०७२०५००२०२३	पंकज मोहन गडपायले
शाखाचे नाव: हिंगोली	
०९५२०५०००५८२	सतीशकुमार रामसिंग गौतम
शाखाचे नाव: खामगाव	
०८६९०५००१११८	रवींद्र त्र्यंबक उमाळे
शाखाचे नाव: खरबडी	
२९२४०५०००५५५	अभय विजय कांडेलकर
शाखाचे नाव: लातूर	
०३४१०५००९९२५	दिलीप किशनराव चेंगे
०३४१०५००८१४०	बालाजी सुरेश मदने
शाखाचे नाव: लातूर-कामदार रोड	
१६९९०५००१३६२	गजानन एल राजहंस
शाखाचे नाव: लातूर-एमआयडीसी	
३३५५०५०००८३३३	सौरभ नारायणराव घोलप
शाखाचे नाव: मलकापूर-बुलढाणा	
१४५३०५००४५७५	योगिता अतुल गावंडे
१४५३०५००३७५३	अमोल श्रद्धा नारखेडे
शाखाचे नाव: मनवथ	
४०५३०५००९३०७	पाराजी रामभाऊ काळे
शाखाचे नाव: मोर्शी	
४०५८०५००१०३९	सुशीला अजबराव घाणेकर
४०५८०५००१९१६	सचिन ढाणे
शाखाचे नाव: मूर्तिजापूर	
४१०१०५०००३७२	कुलदिप शंकरराव अवघड
शाखाचे नाव: नांदेड	
६४६४०५००३१११	जसवंत सिंग महेलसिंग भाटिया
६४६४०५००३२०२	अर्जुन मारोती पावडे
शाखाचे नाव: नांदेड-विसावानगर	
१४६६०५००६५५४	नंदकुमार वामनराव लोमटे
१४६६०५००६७८७	बाळासाहेब हिरामणराव बोकारे
१४६६०५००८३३४	रामदास सिद्धराम करे
शाखाचे नाव: नंदूरबार	
०७६९०५००४६३४	हिम्मत हशरत पाटील
शाखाचे नाव: निलंगा	
२०१४०५००७२५३	सुलक्षण वसंतराव धायवाँ
२०१४०५००९१११	धनराज बालाजी लोभे
२०१४०५००९१८७	लिंबराज मोहन जाधव
शाखाचे नाव: उस्मानाबाद	
१६३७०५०१२३१६	रमीझ अलीमोद्दीन शेख
१६३७०५०१५०४६	विश्वनाथ शिवदास साखरे
१६३७०५०१३०७८	गणेश रघुनाथ कदम
१६३७०५०१३३३७	दत्ता काका रणदिवे
१६३७०५०१४६४०	कौसर इब्राहिम सय्यद
शाखाचे नाव: पैठण	
२०१२०५०००८६०७	मोहसीन आजमोदिन शेख
२०१२०५००९३४८	भाऊसाहेब मिठू नाटकर

कर्ज खाते क्र.	ग्राहकाचे नाव
शाखाचे नाव: परंडा	
२८२००५०१०१५२	दिपक रामभाऊ कुंभार
शाखाचे नाव: परळी वैजनाथ	
२५९९०५००३६१०	विरप्पा शंकरराव उबाळे
शाखाचे नाव: परतूर	
३७६७०५००१३३४	गणेश बाळासाहेब मस्के
शाखाचे नाव: पुलगाव	
६९९६०५६००९४७	आशिष विजेंद्रजी पांडे
६९९६०५६००९६२	राजश्री रवींद्र धारगावे
६९९६०५६००९७२	आकाश राऊत
शाखाचे नाव: पुसद	
१०७८०५००६८७४	पंकज शेषराव साठे
शाखाचे नाव: सायलू	
३७६८०५००४५७३	परमेश्वर आसाराम गायद्धे
३७६८०५००४६१७	तुळशीराम दत्ता पांचाळ
शाखाचे नाव: शहादा	
०७७००५००३३८०	मुकुंद प्रल्हाद चौधरी
०७७००५००३९५६	आनंदा अहिरराव
शाखाचे नाव: शिरजगाव	
४१९५०५०००५५५	दिनेश शिवलाल काशीकर
शाखाचे नाव: शिरपूर	
०८७१०५००५२९४	प्रफुल्ला पाटील
०८७१०५००६७३५	मोहिनी प्रवीण महाजन
०८७१०५००७१०३	तेजस्विनी दिलीप पाटील
शाखाचे नाव: सिल्लोड	
१७७९०५००८७७२	अमोल श्रीरंग बनकर
शाखाचे नाव: सिंदखेडा	
२१३३०५००७७७३	सरदार रतनसिंग गिरासे
२१३३०५००८२०७	भिका पोपट पाटील
शाखाचे नाव: तिरोरा	
२०३८०५००४९३३	खुशाल देवाजी कोसरकर
शाखाचे नाव: तुळजापूर	
२०३३०५००९११६	रमेश व्यंकटराव काळे
शाखाचे नाव: तुमसर	
२१२००५००१७१८	रामरतन जयदेव माटे
शाखाचे नाव: उदगीर	
११०७०५०१२८०४	संजयकुमार उत्तमराव परकोटे
११०७०५००८२५०	मो.वसीम ए बारी हाश्मी
शाखाचे नाव: उमरगा (ओमेरगा)	
२८१८०५००३६०६	विश्वनाथ लक्ष्मण सुर्यवंशी
२८१८०५००२२४७	मारुती गोपाळ राठोड
२८१८०५००२५५५	रविबाबू पवार
२८१८०५००३७०६	भगवान दासू माने
२८१८०५००३४८९	राहुल सुभाष तडकळे
२८१८०५००३५०८	विनोद महादेव स्वामी
२८१८०५००३५४२	गणपत विठ्ठल चव्हाण
२८१८०५००३५९६	विनोद महावीर शिंदे
शाखाचे नाव: वणी	
०९५८०५००७१५७	गजानन मबादेव लांबट
०९५८०५००९२४५	संजय बापूराव पवार
०९५८०५००९२४६	संजय बापूराव पवार
शाखाचे नाव: वर्धा	
१०८००५००५१३६	शेषराव नामदेवराव लोणारे
शाखाचे नाव: वरुड	
१६९६०५००४३२४	सुनीता राजाभाऊ गावंडे
१६९६०५००६१११	गोपाळ कृष्णराव शिरसागर
१६९६०५००६११४	जगदीश सुरेश हुड
१६९६०५००६११६	सविता रामकृष्ण राऊत
शाखाचे नाव: वाशिम	
०६१५०५००४५३६	विनोद पोळ
०६१५०५००४५४२	राजेश श्रीधरराव देशमुख
०६१५०५००४५४३	राजेश श्रीधरव देशमुख

दिनांक : १०.०१.२०२२
ठिकाण : अकोला, अमरावती, औरंगाबाद, भंडारा, बीड, बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, गोंदिया, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, नंदुरबार, उस्मानाबाद, परभणी, वर्धा, वाशिम, यवतमाळ

सही/-
प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय बँक लिमिटेड करिता

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की माझे अशील श्री. राजमल दावाचंद जैन, हे श्री. शैलेश मूरजी गोठी यांचे एकमेव वारस असलेले श्रीम. आनंदीबेन मूलजीभाई गोठी आणि श्रीम. रमीला शैलेश गोठी यांच्याकडून या खालील लिखित परिशिष्टामध्ये अधिक तपशीलवारपणे विवर्णीत निवासी परिसराच्या खरेदीसाठी इच्छुक आहे. त्यांचा जिवन काळामध्ये शिवालीक वेंचर्स प्रा. लि. आणि गजराज डेव्हलपर्स शी या खालील लिखित परिशिष्टामध्ये अधिक तपशीलवार पणे विवर्णीत सदर निवासी अपार्टमेंट च्या खरेदीसाठी अनु. क्र. बीडीआर-४-१५९-२०२० अन्वये वांद्रे येथील हमीच्या उपनिबंधकाकडे नोंदणीकृत दिनांक १४ जानेवारी, २०२० च्या विक्रीच्या करारामध्ये भाग घेतला होता. त्यांचे २०-०१-२०२० रोजीस नवी मुंबई येथे मृत्यूपत्र न बनविता निधन झाले, आणि त्यांच्या निधनाचे वेळी त्यांना लागू असलेले नियमानुसार त्यांचे एकमेव वारस म्हणून श्रीम. आनंदीबेन मुलजीभाई गोठी आणि श्रीम. रमीला शैलेश गोठी यांना मागे सोडून गेला. कोणत्याही व्यक्तिस सदर निवासी अपार्टमेंट च्या संदर्भात वारसा, भाग, विक्री, गहाण, भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, भेट, नामनिर्देशन किंवा बोजा किंवा अन्यकाही च्या मार्गे कोणत्याही दावा किंवा हक्क असल्यास त्यांनी ह्या सूचनेची प्रसिध्दीची तारखेपासून १५ दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकाराकडे पुष्ठ्यर्थ दस्तावेजसह अशा दावा कळवावा, कसूर केल्यास अशा दाव्याच्या संदर्भाशिवाय सदर निवासी अपार्टमेंटच्या वरील नमूद व्यवहार पूर्ण केला जाईल आणि अशा व्यक्तिंचे दावे, जरी असल्यास, सोडून दिला असा मानण्यात येईल आणि माझे अशिलावर बंधनकारक नसेल.

वरील संदर्भित परिसर
(निवासी अपार्टमेंटचा विवरण)

जवाहर नगर, रेल्वे पूलासमोर, खार (पूर्व), मुंबई, आणि गाव वांद्रे (पूर्व), तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्ह्याच्या सीटीएस क्र. २५५, २५५/१ ते २५५/३६, सीटीएस क्र. २५६, २५६/१ ते २४ आणि सीटीएस क्र. २५७ आणि २५७/१ ते ७ धारक मिळकतीवर बांधकामित असलेले प्रमात दर्शन अशा ज्ञात बिल्डिंगच्या बी विंग मधील ७ व्या मजल्यावर क्र. ७१२ धारक निवासी परिसर, मोजमापित २९१ चौ. फू. चटई क्षेत्र, च्या ते सर्व

दिनांक: १०/०१/२०२२
ॲड. स्वाती गावडे
पत्ता: मयुरेश बिल्डिंग, तळ मजला, टेंभी नाका, ठाणे प ४०० ६०१.

जाहीर सूचना

माझे अशील **सौ. वुटुकुरी संगीथा** हे संगीत कॉम्पलेक्स इमारत क्र. ११ सीएचएस लि., जेसल पार्क, भाईंदर(पू), जिल्हा ठाणे मधील १ल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १०६ चे मालक आहेत. माझ्या अशिलांनी त्यांचा मे. हरासिद्ध कॉर्पोरेशन आणि **सौ. शेहनाझ बेगम जे. इनामदार** यांच्यातील निष्पादित १४/०१/१९८९ रोजीचा मूळ बिल्डर करार हा ३०/१२/२०२१ रोजीस ऑटोमध्ये हरविले आहे, ज्याची गहाळ नोंद क्र. ५००-२०२२ धारक पोलिस तक्रार त्यांनी दाखल केली आहे. म्हणून माझ्या अशिलाच्या आणि बिल्डर/प्रवर्तक/सोसायटीच्या वतीने मी याद्वारे सदर सुचना प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत दावे/आक्षेप/तिसऱ्या पक्षांचे दावे मागवित आहे, जर कोणत्याही व्यक्ती/व्यक्तींचे कोणत्याही स्वरूपाचे दावे/आक्षेप असल्यास ते **वकिल पी.एस. शामदसानी** पत्ता **१५४/२, ओस्तवाल ऑर्नेट सीएचएस, जेसल पार्क, भाईंदर (पू.), जिल्हा ठाणे येथे किंवा माझे अशिल ९८३३१५०१६५** किंवा ईमेल आयडी: vkvutukuri@yahoo.com येथे त्यांचे दावे/मागण्या आदींच्या पुष्ठ्यर्थ जसे दस्तावेज, पुराव्यांच्या प्रतीसह संपर्क साधावा. सदर सुचना प्रसिध्दीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत कोणतेही दावे प्राप्त न झाल्यास असे समजले जाईल की सदर फ्लॅट चे नामाधिकार हे स्पष्ट आणि पणनयोग्य आणि सर्व भारापासून मुक्त आहेत त्यानूसार प्रमाणपत्र जारी केले जाईल. त्यानंतर कोणतेही दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

पी. एस. शामदसानी ॲण्ड असोशिएट्स
सही/-
पुष्पा शामदसानी
(वकील उच्च न्यायालय)
दिनांक: १०/०१/२०२२

ऊसवाहतूक वाहनांना जीपीएस प्रणाली

कृष्णा कारखान्याचे आधुनिकतेकडे पाऊल

रामभाऊ जगताप/कराड

येथील कृष्णा सहकारी साखर कारखाना नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारा म्हणून महाराष्ट्रात ओळखला जात आहे. आता जीपीएस म्हणजेच ग्लोबल पोसिशन सिस्टिम प्रणालीचा अवलंब ऊसवाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी करत कृष्णा कारखान्याने आधुनिकतेकडे आणखी एक पाऊल टाकले आहे.

शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी जयवंत आदर्श कृषि योजना, शेतकरी संवाद मेळावे, अल्प दरात द्रवरूप जीवाणू खते, सेंद्रिय खते, माती परिक्षण, सभासदांना मोफत घरपोच साखर यासारखे उपक्रम कारखाना सातत्याने राबवित आहे. कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने ई-टेंडर प्रणाली राबविण्यात आली. कृष्णा कारखान्यात जीपीएस प्रणालीचा वापर ऊसवाहतूक करणाऱ्या वाहनांना केला जात आहे. ही जीपीएस प्रणाली अत्याधुनिक पद्धतीची असून कारखान्याच्या संगणक विभागाने तयार केली आहे.

कृष्णा कारखान्यात नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब आपण करत आलो आहोत.ऊस नोंदणीसाठी मोबाईल अँप, ई-करार, ई-टेंडरिंग यासारखे नाविन्यपूर्ण प्रयोग पहिल्यांदा कृष्णा कारखान्यात करण्यात आले. आता जीपीएस प्रणालीच्या वापरामुळे तोडणी यंत्रणा गतिमान झाली असून ज्याचा फायदा शेतकऱ्यांना व कारखान्यास निश्चितपणे होणार आहे.

जीपीएस प्रणालीमुळे ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचे प्रत्येक ऊसाच्या प्लॉटपासून ते कारखाना साईटपर्यंतचे अचुक अंतर समजते. तसेच वाहनांचे अचूक लोकेशन, इंधनाची स्थिती समजते.

कोयना परिसरात २.९ रिश्टर स्केलचा भूकंप

वार्ताहर/कराड

कोयना धरण परीसरासह सातारा व रत्नागिरी जिल्ह्यांतील सीमावर्ती विभागात शनिवारी दुपारी सव्वादोनच्या सुमारास भूकंपाचा सौम्य धक्का जाणवल्याची माहिती कोयना धरण व्यवस्थापनाकडून देण्यात आली. या भूकंपाची तीव्रता २.९ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली. त्यामुळे कोयना धरणासह परिसरात कोणतीही जिवीत वा वित्तहानी झाली नाही.

भूकंपाचा केंद्रबिंदू कोयना धरणापासून ८ कि.मी. अंतरावर हेळवाक गावच्या नैऋत्येस होता तर भूकंपाची जमिनीतील खोली ४ कि.मी.असल्याचे सांगण्यात आले. हा भूकंप कोयना, पाटण, कराड, चिपळूण, पोफळी तसेच सातारा व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही विभागांत जाणवला. भूकंपाच्या धक्क्यानंतरही कोयना धरण पूर्णपणे सुरक्षित असल्याची माहिती धरण व्यवस्थापन व प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

रेल्वे रुळावर काम करणाऱ्या महिलांचा मृत्यू

नागपूर : काटोल तालुक्यातील मेंढेपठार-लाखोळी रेल्वे परिसरातील रेल्वे रुळाचे काम कमणाऱ्या दोन महिला मजुरांचा रेल्वेने कटून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सायंकाळी काटोल रेल्वे पोलिस हद्दीत घडली. शोभा शिवचरण नेहारे (५२) व प्रभा प्रल्हाद गजभिये (५०) असे मृत महिलांची नावे आहेत.

शोभा, प्रभा व इतर मजूर रेल्वे पटरीवर पेटिंग व गिट्टी बाजूला करण्याचे काम करीत असताना अचानक आलेल्या एक्स्प्रेस गाडीने महिला गडबडल्या. काही लगेच बाजूला हटल्या. त्यात एक महिला बाजूला होत असताना बचावली. पण, शोभा आणि प्रभा या गाडीखाली आल्याने दोघींचाही दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेमुळे वाघोडा व खुंटाबा गावात शोककळा पसरली आहे. मध्य रेल्वेच्या वतीने नागपूर-दिल्ली तिसऱ्या लाईनचे काम सुरू आहे.

या कामावर कंत्राटदाराने स्थानिक मजुरांना ठेवले असून, यातून काटोल तालुक्यातील बहुसंख्य महिला कामावर नियमितपणे आहे. परंतु, मजुरांना कामावर सुरक्षितेसंबंधी सूचना, विशिष्ठ कामावरील गणवेश, हेल्मेट आदी पुरवठा करणे आवश्यक आहे. ज्या ट्रकवर रेल्वे धावत आहे. त्यासंबंधी सूचना कामावरील व्यवस्थापकांनी मजुरांना देणे आवश्यक आहे. रेल्वे स्टेशनमार्फत रेल्वे चालकाला काम सुरू असल्याचे भ्रमणध्वनीद्वारा सूचना देणे आवश्यक असताना यातील मजुरांना सूचना न मिळाल्याने आजची दुर्घटना घडली.

PUBLIC NOTICE

Public at large is hereby informed that the Residential Flat (the "Flat") described in the Schedule hereunder written is owned by "Elara Trading and Services Limited" , a Company incorporated under the provisions of the Companies Act, 1956 and having its Registered Office at 404, 4th Floor, "Lunkad Sky Station Co-operative Premises Society Ltd.", Viman Nagar, Pune- 411 014 (the "Owner"). Mr. Yogesh Sakharam Thakar and Mrs. Uma Yogesh Thakar have approached the Owner and shown interest in purchasing the Flat and negotiations for the same are in progress. Also, the Owner has informed Mr. Yogesh Sakharam Thakar and Mrs. Uma Yogesh Thakar that the Original Agreement for Sale dated 2nd April, 1998 of the Flat registered at the Office of the Sub-Registrar of Assurances, Mumbai bearing Serial No.1286/1998 executed between "Rahultex Industries Limited" and "Indian Seamless Financial Services Limited" (now known as "Elara Trading and Services Limited") is lost/misplaced. The Owner has assured Mr. Yogesh Sakharam Thakar and Mrs. Uma Yogesh Thakar that their title to the Flat is free, clear and marketable and that there are no encumbrances on or in respect of the Flat. In the above circumstances, if any person/s has/have any claim, right, demand and interest in respect to the Flat are required to intimate the same in writing to the undersigned together with authentic proof to substantiate their claim within 15 (fifteen) days from the date of publication of this notice failing which it shall be presumed that there is no such claim and the same, if any, shall be considered to be waived / abandoned.

THE SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO:
All that piece and parcel of Flat No. B/ 405 situated on the 4th floor at the "Anupam Co-operative Housing Society Limited", Manpada Road, Opp. Vijaya Bank, Survey No.57, Hissa No. 3 (Part) of Gajbanadan Pathreli, Dist.: Thana, Dombivli (East) - 421 201 admeasuring 610 sq. ft. Built Up Area , which is bounded as under :
On or Towards EAST : By Survey No. 12
On or Towards SOUTH : By Plot No.39
On or Towards WEST : By Dombivli-Manpada Road
On Or Towards NORTH : by Plot No. 37
Date : Atmaram V. Patade, Advocate Mumbai
Office No.2/2, 1st Floor, 71/73, Botawala Building
Mumbai Samachar Marg, Fort, Mumbai- 4000 023
E-mail :sachin.patade777@gmail.com Contact: 8850967662

TRE